Exhibit-A

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा

क्रमांक : सी/कार्या-३डी/कावि-२४/२०१४/494
दिनांक : /१०/२०१४
- 4 OCT 2014

**वाचले** : १) जनहित याचिका क्र. १५५/२०१०, १३६/२००९, २५/२०१३, ४५/२००९ मध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाने दि. ६/८/२०१४ रोजी पारीत केलेले आदेश.

२) शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील पत्र क्र.पीआयएल-२०१४/प्र.क्र.१८७/ज-१, दि.२६/८/२०१४.

**कार्यालयीन आदेश :**

प्रकरणी महाराष्ट्र राज्यातील बहुसंख्य शहरातील रस्ते व अन्य भागात तसेच रस्त्याच्या कडेला, इमारतींच्या भिंतीवर व इतर ठिकाणी जाहिरात फलक, साईन बोर्डस , बॅनर्स उभारून शहराचे होत असलेले विद्रुपीकरणा विरूध्द जनहित मंच व इतर यांनी मा.मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचिका क्र.१५५/२०१०, १३६/२००९, २५/२०१३, ४५/२००९ मध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाने दि. ६/८/२०१४ रोजी सुनावणी घेऊन आदेश पारीत केले आहेत.

सदरच्या आदेशान्वये राज्यातील विविध शहरांच्या रस्त्याच्या कडेला, चौकांमध्ये, इमारतीच्या भिंतीवर व अन्य ठिकाणी उभारण्यात येणारे अनधिकृत जाहिरात फलक व बॅनर्स यांचे विरूध्द संबंधीत शहरातील महानगर पालिका, नगर पालिका व पोलिस विभाग कारवाई करतात. संबंधीत कायदयाखाली न येणारे अशा अनधिकृत पोस्टर, बॅनर इत्यादीवर महाराष्ट्र मालमत्ता विद्रुपीकरण प्रतिबंध अधिनियम १९९५ नुसार कार्यवाही करणे आवश्यक ठरते, अशा प्रकरणात संबंधीतांनी जिल्हाधिकारी यांनी नियुक्ती केलेल्या नोडल ऑफीसर यांचेकडे अहवाल सादर करणेबाबत मा. उच्च न्यायालयाने आदेशीत केले आहे. त्यामध्ये नोडल ऑफीसर यांनी महाराष्ट्र मालमत्ता विद्रूपीकरण प्रतिबंध अधिनियम, १९९५ नुसार पुढील कार्यवाही करणेची आहे. मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार अनधिकृत जाहिरात फलक, बॅनर्स यांचेबाबतच्या तक्रारी नोंदविण्यासाठी निशु:ल्क दुरध्वनी क्रमांक उपलब्ध करून देणेचा असून उपजिल्हाधिकारी दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्याची नोडल ऑफीसर म्हणून नियुक्ती करणेची आहे.

सबब मा.मुंबई उच्च न्यायालयाचे उपोदघातातील अं.क्र.१ कडील आदेशानुसार मुंबई उपनगर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात उभारण्यात येणारे अनधिकृत जाहिरात फलक व बॅनर्स यांचेविरूध्द महाराष्ट्र मालमत्ता विद्रुपीकरण

जिल्हाधिकारी,मुंबई उपनगर यांचे कार्यालय, प्रशासकिय इमारत १० वा मजला,शासकिय वसाहत,बांद्रा (पूर्व)मुंबई ५१
कार्यालय ९१-२६५५६७९९/२६५५७८०७ फॅक्स २६५५६८०५ इमेल mumbaisuburbancollector@mah.gov.in

प्रतिबंध अधिनियम, १९९५ नुसार कारवाई करणेबाबतची कार्यवाही करणेकामी नोडल ऑफीसर म्हणून खालील अधिकाऱ्यांची नेमणूक करणेत येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नावं व पदनाम | कार्यक्षेत्र |
|---|---|---|
| १. | श्री. दत्तप्रसाद नडे, उपविभागीय अधिकारी, पूर्व उपनगरे. | कुर्ला तालुका. |
| २. | श्री. नवनाथ जरे, उपविभागीय अधिकारी, पश्चिम उपनगरे. | अंधेरी व बोरीवली तालुका. |

संबंधीत अधिकाऱ्यांनी त्यांचे नावांसमोर नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रासाठी नोडल ऑफीसर म्हणून मा.मुंबई उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र.१५५/२०१०, १३६/२००९, २५/२०१३, ४५/२००९ बाबत पारीत केलेल्या दि.६/८/२०१४ रोजीच्या आदेशात नमूद केल्याप्रमाणे काम करणेचे आहे. तसेच अनधिकृत जाहिरात फलक व बॅनर्स यांचेबाबत माहिती व तक्रारीसाठी एक निशुःल्क दुरध्वनी क्रमांक उपलब्ध करून घेवून त्यास वृत्तपत्रांमधून प्रसिध्दी द्यावी.

सदरचे आदेशास तात्काळ अंमल देणेत यावा.

मा. जिल्हाधिकारी
यांची सही आहे.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरिता

प्रत : १) सहाय्यक सरकारी वकील, मुंबई उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई
२) मा. अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग यांचेकडे त्यांचेकडील पत्र क्र.पीआयएल-२०१४/प्र.क्र.१८७/ज-१, दि. २६/८/२०१४ च्या अनुषंगाने सविनय सादर.
३) मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग
४) मा. पोलिस आयुक्त, मुंबई पोलिस.
५) मा. महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगर पालिका.
६) मा. अतिरिक्त पोलिस आयुक्त, पूर्व विभाग/ पश्चिम विभाग /उत्तर विभाग
७) मा. पोलिस उपायुक्त, परिमंडळ ६ /७/ ८ /९ /१०/११/१२
८) महापालिका उपआयुक्त, परिमंडळ ६ व ७
९) उपविभागीय अधिकारी, अंधेरी व बोरीवली तालुका / कुर्ला तालुका.
१०) सहा. महापालिका आयुक्त, एच- पूर्व / एच- पश्चिम/ के-पूर्व/ के-पश्चिम/एल / एम/ एन / पी-उत्तर / पी-दक्षिण/ आर /एस / टी विभाग
११) तहसिलदार, अंधेरी/बोरीवली/ कुर्ला
१२) वरीष्ठ पोलिस निरिक्षक, चेंबूर/ नेहरूनगर/ ट्रॉम्बे /आरसीएफ/ देवनार/शिवाजीनगर /टिळकनगर /मानखुर्द /घाटकोपर /पंतनगर /विक्रोळी/ पार्कसाईट/ भांडूप/ कांजूरमार्ग/ मुलुंड/ नवघर/ वाकोला/ विलेपार्ले/

खेरवाडी/ निर्मलनगर/ बीकेसी/ विमानतळ/ सहार/ बांद्रा/ खार/ सांताक्रूज/ जुहू/ डी.एन.नगर/ वर्सोवा/ ओशिवरा/ आंबिवली/ मेघवाडी/ जागेश्वरी/साकीनाका /पवई/ अंधेरी/ एमआयडीसी/ गोरेगाव/ मालाड/ बांगूरनगर/ चारकोप/ मालवणी/कांदिवली/बोरीवली/गोराई/ एमएचबी/दिंडोशी/आरे/गोरेगाव पूर्व/ समतानगर/ कुरार/ दहिसर/ कस्तुरबामार्ग पोलिस ठाणे.

१३) निवड नस्ती

OFFICE OF THE
SUB-DIVISIONAL OFFICER
Mumbai W... Suburban.
3747
16/10/14
श्री नाईक
S. D. O.
A. K. N. T. M.W.S.

1060/14